सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ७ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# महाविद्यालयातील चोरी उघड; आरोपी ताब्यात

प्रतिनिधी ७ जून

**महागाव** : येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात चोरी करून संगणक व अन्य साहित्य लंपास करणाऱ्या चौघांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, म्होरक्याला गजाआड केरण्यात आले. सूरज प्रकाश पवार (२४), रा. महागाव, असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. महागाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या इमारतीचे कुलूप व कडीकोंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी संगणक, प्रिंटर आणि इतर साहित्याची चोरी केली होती. तपासादरम्यान सूरज व त्याच्या तीन साथीदारांनी हा गुन्हा केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार महागाव बाजारपेठ परिसरात सापळा रचून सूरज पवार याच्या मुसक्या आवळल्या.

# बहिणीच्या छेडछाडीच्या रागातून युवकाची हत्या

## कड्याने आणि तंबाखूच्या डबीने उलगडले खुनाचे गूढ

प्रतिनिधी ७ जून

**यवतमाळ** : मार्डा डॅमच्या जंगलातील खड्ड्यात आढळलेल्या कुजलेल्या अनोळखी मृतदेहाच्या गूढाचा मारेगाव पोलिसांनी अवघ्या २४ तासांत उलगडा करत तिघा आरोपींना अटक केली.

बहिणीच्या छेडछाडीचा राग मनात धरून आरोपींनी संगनमताने गळा आवळून हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या गुन्ह्याचा छडा लावण्यात मारेगाव व शिरपूर पोलिसांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

विनोद प्रल्हादराव सहारे (वय ३५, रा. मरेगाव, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर) असे मृतकाचे नाव आहे. तर प्रविण अशोक वरधने (रा. आपटी, ता. मारेगाव), राजू नथ्थुजी ढेंगळे (रा. दांडगाव, ता. मारेगाव) आणि शंतनू झाडे (रा. नागरी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर) अशी आरोपींची नावे आहे.

घटनास्थळी पाहणी करताना मृताच्या हातातील पांढऱ्या धातूचे कडे आणि जवळ सापडलेली तंबाखूची प्लास्टिक डबी हे दोन महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले. सहायक फौजदार दिगंबर किनाके यांनी या धाग्यांच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली.

विविध ठिकाणी चौकशी आणि तांत्रिक माहितीच्या आधारे मृतदेह विनोद प्रल्हादराव सहारे (वय ३५, रा. मरेगाव, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर) याचा असल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, समांतर तपास करणाऱ्या शिरपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष मनवर, पोलीस हवालदार इकबाल शेख आणि अजय वाभिटकर यांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तीन संशयितांना ताब्यात घेतले.

त्यानंतर सहायक फौजदार दिगंबर किनाके यांनी आरोपींकडे उपलब्ध पुरावे ठेवून कसून चौकशी केली. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मृत विनोद सहारे हा मुख्य आरोपीच्या बहिणीला वारंवार त्रास देत होता. याच रागातून आरोपींनी त्याचा खून करण्याचा कट रचला. ३ जून रोजी विनोदला वरोरा रेल्वे स्थानकावरून दुचाकीवर बसवून मार्डा डॅम परिसरातील जंगलात नेण्यात आले. तेथे तिघांनी मिळून त्याचा गळा आवळून खून केला आणि मृतदेह जंगलातील खड्ड्यात फेकून दिला.

> ■ दांडगाव शिवारातील मार्डा डॅम परिसरातील जंगलात ५ जून रोजी एका खड्ड्यात कुजलेल्या अवस्थेतील अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. माहिती मिळताच मारेगावचे पोलीस निरीक्षक श्याम वानखेडे, सहायक फौजदार दिगंबर किनाके आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब असल्याने ओळख पटविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते.

या प्रकरणात प्रविण अशोक वरधने (रा. आपटी, ता. मारेगाव), राजू नथ्थुजी ढेंगळे (रा. दांडगाव, ता. मारेगाव) आणि शंतनू झाडे (रा. नागरी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर) यांना अटक करण्यात आली आहे.

या कारवाईत पोलीस निरीक्षक श्याम वानखेडे, सहायक फौजदार दिगंबर किनाके, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद जिद्देवार, पोलीस शिपाई सागर दीपेवार, राजन इसंकर तसेच शिरपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष मनवर, पोलीस हवालदार इकबाल शेख आणि अजय वाभिटकर यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. पुढील तपास पोलीस निरीक्षक श्याम वानखेडे करीत आहेत.







# १८ हातभट्ट्या उद्ध्वस्त; लाखोंचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ७ जून

**पुसद**: अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीविरोधात पुसद शहर पोलिसांनी राबविलेल्या विशेष धाडसत्रात १८ हातभट्टी अड्डे उद्ध्वस्त करत १ लाख ६१ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

पुणे येथे घडलेल्या अलीकडील घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार पुसद शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी स्वतंत्र पथके तयार करून ३ जूनपासून विशेष मोहीम हाती घेतली.

या मोहिमेदरम्यान आरेगाव, मोहा, अश्विनपूर, सेलू, बोरनगर, वसंतपूर आणि बोरी परिसरातील विविध ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. कारवाईत सुमारे २ हजार १०० लिटर मोहामास सडवा नष्ट करण्यात आला, तर ५६ लिटर गावठी हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्यही ताब्यात घेण्यात आले. एकूण १८ अवैध हातभट्टी अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले.



या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच भविष्यात अशा प्रकारचे गुन्हे पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक कारवाईही करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे, पोलीस उपनिरीक्षक अक्षय सनगर, राजू ठोंबरे तसेच पुसद शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधातील मोहीम पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवरायांना अभिवादन

प्रतिनिधी ७ जून

**यवतमाळ** : अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत तथा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शुक्रवारी यवतमाळ शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिवतीर्थ येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या हस्ते यवतमाळ नगरपरिषदेच्या कॅबिनमध्ये तसेच नगरपरिषद परिसरातील शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी शिवरायांच्या कार्याचा व विचारांचा जागर करत त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. ६ जून १६७४ हा दिवस भारतीय इतिहासातील सुवर्णक्षण मानला जातो. याच दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होऊन हिंदवी स्वराज्याची अधिकृत स्थापना झाली. न्याय, शौर्य, लोककल्याण आणि सुशासनाचा आदर्श घालून देणाऱ्या शिवरायांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. शिवरायांनी दिलेला स्वराज्याचा विचार, राष्ट्रप्रेम आणि समाजहिताची भावना प्रत्येक पिढीला दिशा देणारी असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमास नगरसेविका प्रियांका तिवारी, नगरसेविका श्रद्धा भडके, गटनेते नितीन गिरी, शांतनू शेटे, बंटी श्रीवास यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# हायवे लगत मोकाट जनावरांचा सुळसुळाट

## अज्ञात वाहनाच्या धडकेत बैल ठार



प्रतिनिधी ७ जून

**पाटणबोरी** : परिसरात मोठ्या प्रमाणात शेती व्यवसाय केला जात असून उन्हाळ्याच्या दिवसांत अनेक शेतकरी बैलांसह इतर जनावरे मोकाट सोडतात. चाऱ्याच्या शोधात ही जनावरे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ लगत फिरत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे.

महामार्गाच्या कडेला गवत व चारा उपलब्ध असल्याने जनावरांचे कळप तेथेच चरतात. मात्र या मार्गावर वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे जनावरे अचानक रस्त्यावर आल्यास गंभीर अपघात घडतात. अशा अपघातांत आतापर्यंत अनेक जनावरे दगावली आहेत.

याच पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. ४) सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास एका अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका शेतकऱ्याचा बैल ठार झाला. मृत बैलाची किंमत सुमारे ७० ते ८० हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

स्थानिकांच्या मते, राष्ट्रीय महामार्गालगत तारकंपाऊंड उभारल्यास जनावरांचे रस्त्यावर जाणे कमी होईल. तसेच शेतकऱ्यांनीही आपली जनावरे सुरक्षितपणे गोठ्यात बांधून ठेवण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. अन्यथा अशा दुर्घटनांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# एटीएम फोडीचा प्रयत्न फसला; आरोपी रंगेहात जेरबंद

## घाटंजी पोलिसांच्या सतर्कतेचे एसपींकडून कौतुक

प्रतिनिधी ७ जून

**यवतमाळ** : महाराष्ट्र बँकेचे एटीएम फोडून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सराईत आरोपीला घाटंजी पोलिसांनी रंगेहात पकडून मोठी चोरी टाळली. या धाडसी व तत्पर कारवाईबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षकांनी संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांना एकूण १५ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे.

६ जून रोजी पोलीस स्टेशन घाटंजी येथील सहायक फौजदार राहुल खंडागळे, पोलीस अंमलदार दत्ता कुसराम व सचिन नैताम हे अवधूतवाडी येथील खून प्रकरणातील आरोपीचा शोध घेत असताना यवतमाळ येथील सीआरओकडून घाटंजीतील महाराष्ट्र बँकेचे एटीएम फोडले जात असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

तेथे पोहोचल्यावर महाराष्ट्र बँकेचे एटीएम फोडलेले असल्याचे आढळून आले. याबाबत पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांना माहिती देण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार परिसरातील इतर एटीएमची तपासणी सुरू करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र बँकेच्या एटीएमपासून सुमारे ५० मीटर अंतरावर असलेल्या एचडीएफसी बँकेच्या एटीएमजवळील गल्लीत एका ट्रॅक्टरच्या मागे अंधारात एक संशयित इसम लपून बसलेला दिसला.



पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेतले. चौकशीत तो विजय तानबाजी मडावी (वय ३०, रा. राजूरवाडी, ता. घाटंजी) असल्याचे निष्पन्न झाले. तो रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचेही समोर आले. त्याच्या झडतीत दोन धातूची पाने तसेच स्क्रू ड्रायव्हरप्रमाणे वापरता येईल असा वाहनाचा छोटा वायपर आढळून आला.

संशयिताला ताब्यात घेऊन एटीएममधील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली असता तो एटीएम फोडताना स्पष्टपणे दिसून आला. त्यामुळे त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

सीआरओ यवतमाळ व घाटंजी पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठी चोरी होण्यापूर्वीच हा प्रयत्न हाणून पाडण्यात आला.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोलिसांचे अभिनंदन केले. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांनी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार करून राहुल खंडागळे, दत्ता कुसराम आणि सचिन नैताम यांना प्रत्येकी ५ हजार रुपये, असे एकूण १५ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस प्रदान केले.

या कारवाईचे नेतृत्व पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी केले.



# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिवरडोल येथे वृक्षारोपण

प्रतिनिधी ७ जून

**पाटणबोरी** : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पांढरकवडा वन विभागांतर्गत वनपरिक्षेत्र जामणी (प्रादेशिक) व डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन विकास योजना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पिवरडोल येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

"निसर्गाशी नातं घट्ट करूया, झाडे लावूया, पाणी वाचवूया आणि पर्यावरण संवर्धनासाठी पाऊले उचलूया" हा संदेश देत ग्रामपंचायत कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच "एक पेड माँ के नाम" या उपक्रमांतर्गतही विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी पांढरकवडा वन विभागाचे उपवनसंरक्षक (DCF) बहाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी (RFO) बी. एम. वाघाडे, समितीचे अध्यक्ष अंकुश ठाकरे, आरएफओ शेलार मॅडम, क्षेत्र सहाय्यक काळे, सोनवणे तसेच वन विभागाचे कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. वृक्षसंवर्धन आणि जलसंवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वीकारावी, असे आवाहन यावेळी उपस्थित मान्यवरांनी केले. ग्रामस्थांनीही वृक्षांची नियमित काळजी घेण्याचा संकल्प करून पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय सहभाग नोंदविला.

# विदर्भ साहित्य संघ यवतमाळ शाखेची नवीन कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी प्रा. डॉ. सतपाल सोवळे

प्रतिनिधी ७ जून

**यवतमाळ** : विदर्भ साहित्य संघाच्या यवतमाळ शाखेच्या अध्यक्ष व कार्यकारिणी पदासाठी झालेल्या सर्वसाधारण सभेत डॉ. सतपाल सोवळे यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

यावेळी कार्यकारिणतील आठ सदस्यांचीही निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अनिरूद्ध पांडे होते तर विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रिय कार्यकारिणीचे सदस्य प्रा. डॉ. देवेंद्र पुनसे, विवेक कवठेकर यांच्यासह यवतमाळ शाखेचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. रमाकांत कोलते, सदस्य प्रा. अशोक मेनकुदळे, प्रा. दिनकर वानखडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. स्थानिक लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयात शुक्रवारी सायंकाळी ही सभा पार पडली. यवतमाळ शाखेचे सचिव प्रा. डॉ. विवेक विश्वरूपे यांनी सभेचे प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. घनश्याम दरणे यांनी सभेच्या अध्यक्षस्थानी अनिरूद्ध पांडे यांची निवड करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यास धनंजय पांडे यांनी अनुमोदन दिले. सभेची सुरुवात झाल्यानंतर मुख्य विषयपत्रिकेनुसार नवीन कार्यकारिणीच्या निवडीचा प्रस्ताव ठेवण्यात आला. यामध्ये उपस्थित सर्व आजीवन सभासदांच्या साक्षीने व आवाजी मतदानाने ही निवड प्रक्रिया अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.



अध्यक्षपदी प्रा. डॉ. सतपाल सोवळे यांचे नाव प्रा. डॉ. ताराचंद कंठाळे सूचविले तर प्रा. गजानन लोहवे यांनी त्याला अनुमोदन दिले. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या निवडीचे स्वागत केले.

अध्यक्षपदाव्यतिरिक्त संस्थेच्या सुयोग्य संचलनासाठी आठ सदस्यांची कार्यकारिणीही यावेळी आवाजी मतदानाने, सर्वानुमते निवडण्यात आली. त्यात डॉ. ललिता घोडे, प्रा. डॉ. ताराचंद कंठाळे, नितीन पखाले, विद्या खडसे, विनोद भगत, धनंजय पांडे, प्रा. अतुल सारडे, मोरेश्वर पुंडशास्त्री यांचा समावेश आहे. सर्वसमावेशक कार्यकारिणी निवडल्याबद्दल उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. या निवडीनंतर नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा. डॉ. सतपाल सोवळे यांनी मनोगत व्यक्त करून जिल्ह्यातील साहित्यिक चळवळीला व उपक्रमांना अधिक गती देण्याचा मानस व्यक्त केला. सभेस विदर्भ साहित्य संघाचे आजीवन सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्तातून साकारले मित्रप्रेम

प्रतिनिधी ७ जून

**आर्णी** : मैत्रीतील जिव्हाळा आणि समर्पण व्यक्त करणारी एक आगळीवेगळी घटना आर्णी तालुक्यातील तळणी येथे घडली. मित्राच्या वाढदिवसानिमित्त त्याचे चित्र स्वतःच्या रक्ताने रेखाटून जिवलग मित्राने अनोखी भेट दिली. या उपक्रमाची परिसरात चर्चा होत आहे.

तळणी येथील अजिंक्य संदीप पोतगंठवार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे मित्र श्रेजल देवपूलवार यांनी ही अनोखी कलाकृती साकारली. अनेक वर्षांपासून असलेल्या घट्ट मैत्रीचे प्रतीक म्हणून त्यांनी स्वतःच्या रक्ताचा वापर करून अजिंक्य यांचे चित्र रेखाटले. चित्रातील बारकावे, चेहऱ्यावरील भाव आणि कलात्मक मांडणी यामुळे ही कलाकृती लक्षवेधी ठरली.

वाढदिवसाच्या दिवशी ही भेट स्वीकारताना अजिंक्य पोतगंठवार भावूक झाले. मित्राने व्यक्त केलेल्या प्रेमाची आणि जिव्हाळ्याची त्यांनी मनापासून दखल घेतली.




श्रेजल देवपूलवार यांनी सांगितले की, ''अजिंक्य हा माझ्यासाठी केवळ मित्र नसून कुटुंबातील सदस्यासारखा आहे. त्याच्याविषयीच्या भावना व्यक्त करण्यासाठी ही वेगळी भेट तयार केली.''

या घटनेनंतर परिसरात मैत्रीच्या नात्याविषयी सकारात्मक चर्चा सुरू झाली आहे. अनेकांनी या कृतीचे कौतुक करत ती मैत्रीतील निःस्वार्थ भावनेचे प्रतीक असल्याचे म्हटले. रक्ताच्या नात्यांइतकेच मैत्रीचे नातेही दृढ असू शकते, याची प्रचिती देणारा हा प्रसंग ठरला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि ७ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## संचार साथी' पोर्टल नागरिकांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी प्रभावी माध्यम

**वाशिम :** मोबाईल चोरी, हरवलेले मोबाईल शोधणे, अनधिकृत मोबाईल कनेक्शनची माहिती मिळविणे तसेच सायबर फसवणुकीपासून संरक्षण मिळविण्यासाठी भारत सरकारच्या दूरसंचार विभागाने विकसित केलेले 'संचार साथी' पोर्टल व ?प नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. दूरसंचार सेवांचा सुरक्षित व जबाबदारीने वापर करण्यासाठी या माध्यमाद्वारे विविध ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. 'संचार साथी'च्या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या नावावर किती मोबाईल क्रमांक कार्यरत आहेत याची माहिती सहज मिळू शकते. ओळखपत्रांचा गैरवापर करून अनधिकृतपणे जारी करण्यात आलेल्या मोबाईल कनेक्शनची पडताळणी करण्यासाठी 'नो युवर मोबाईल कनेक्शन्स (ऊँइण्ध्इ)' ही सुविधा उपलब्ध आहे. यामध्ये संशयास्पद किंवा अनधिकृत मोबाईल क्रमांक आढळल्यास त्याबाबत ऑनलाइन तक्रार नोंदविता येते. मोबाईल फोन हरविल्यास किंवा चोरीस गेल्यास 'सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर (र्ण्ड्)' प्रणालीद्वारे संबंधित मोबाईल तात्काळ ब्लॉक करता येतो. त्यामुळे चोरी झालेल्या मोबाईलचा गैरवापर रोखण्यास मदत होते. मोबाईल पुन्हा प्राप्त झाल्यानंतर तो अनब्लॉक करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. सायबर गुन्हे आणि ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी या पोर्टलवर विविध माहितीपर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांची फसवणूक

# सावधान... शेतकऱ्यांचे लुटारू सक्रीय !

## * बाजारात बोगस बियाण्याचा सुळसुळाट, * प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेतकरी सध्या खरीप हंगामाच्या तयारीला लागले असून मोठ्या प्रमाणात बियाणे खरेदी शेतकऱ्यांकडून केली जात आहे. मागील वर्षीच्या हंगामात पांढऱ्या फुलाच्या सोयाबीनला चांगले उत्पन्न मिळाले होते तसेच दरही जास्त मिळाल्याने यंदा बहुतांश शेतकऱ्यांचा कल हा पांढऱ्या फुलाचे सोयाबीन बियाणे खरेदी कडे वाढला आहे. मात्र अनेक बियाणे कंपन्यांनी हीच संधी ओळखत निकृष्ट दर्जाचे बोगस बियाणे बाजारात उतरवले आहे. नुकताच याचा प्रत्यय वाशिम तालुक्यातील एका शेतकऱ्याला आला असून त्यांनी या संबंधित स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष इंगोले यांच्याकडे तक्रार केली होती.

या शेतकऱ्याने 'विगर' कंपनीचे मालविका हे बियाणे खरेदी करून त्याची उगवण क्षमता तपासणी केली असता केवळ ५० टक्के बियाणे उगवून आले होते. विशेष म्हणजे या कंपनीने बियाणे बॅगवर लावलेल्या लेबल मध्येही केवळ ७० टक्के उगवण क्षमता असल्याचे नमूद केलेले आहे. बियाणे कायद्यानुसार किमान ७० टक्क्याच्यावर उगवण क्षमता असणे गरजेचे आहे. 'विगर' कंपनीने बियाणाची पॅकिंग करण्याआधी त्याची उगवण क्षमता तपासणी केल्याचे लेबलवर नमूद आहे. मात्र उगवण क्षमता तपासणी मध्ये जर काठावरची ७० टक्के इतकी उगवण क्षमता दिसून आली असतांनाही कंपनीने कमी उगवण क्षमता असलेले बियाणे बाजारात का आणले असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.



दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कंपनीने हे बियाणे केवळ २२ किलोच्या पॅकिंगमध्ये उपलब्ध करून दिले असून हे बियाणे कायद्याचे उल्लंघन आहे. नियमानुसार किमान ३० किलो बियाण्याची पॅकिंग करणे आवश्यक असते.

यावव्यतिरिक्तही बिगर कंपनीने बियाणे कायद्याच्या अनेक नियमांचं उल्लंघन केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कृषी विभागाने 'विगर' कंपनीच्या बियाण्याचे प्रत्येक लॉटनुसार नमुने घेऊन त्याची उगवण क्षमता तपासणी करावी व उगवण क्षमता कमी आढळल्यास तसेच बियाणे पॅकिंगच्या बाबतीत नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कंपनीवर कठोर कारवाई करून 'विगर' कंपनीच्या बियाण्याला जिल्ह्यात विक्रीवर बंदी घालावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटने युवक प्रदेशाध्यक्ष दामु अण्णा इंगोले यांच्याकडून करण्यात आली आहे.




### बि-बियाणे व खतही मिळेना बँक पीक कर्जही देईना काय करावे कळेना...

कृतिम खत टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना अडचणीत आणून लूटण्याचे षडयंत्र आखणे सुरू आहे. बियाणे ही मिळेना, बँक पीक कर्ज देईना, बळीराजाला काय करावे कळेना, असे झाले आहे. निसर्गाची साथ साथ मिळत नसल्याने वारंवार संकटाचा सामाना करणाऱ्या बळीराजाला आता पुन्हा खत बि-बियाण्यासाठी वानवान भटकावे लागत आहे. मान्सुन चांगला बरसनार असल्याने समाधानी असलेल्या शेतकऱ्यांना खतासाठी व बि-बियाण्यासाठी फिरावे लागत आहे. शेतीच्या बांधावर खते उपलब्ध करून देण्याची योजना कागदावरच आहे.

### पाच वर्षीच्या तक्रारीवर कारवाई नाही

पाच वर्षापूर्वी बोगस बियाण्यातून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली होती. दुबार-तिबार पेरणीनंतरही शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे निराश झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तब्बल ५ हजार तक्रारी केल्या मात्र, कंपण्या व कृषी सेवा केंद्राच्या हातातील बाहूली झालेल्या कृषी विभागाला यामध्ये काही गांभिर्य दिसले नाही. चार वर्ष लोटले तरी या तक्रारींवर काहीच कारवाई झाली नाही ही वस्तूस्थिती आहे. बोगस बियाण्यांमधून झालेली आर्थिक हानी भरून निघावी यासाठी शेतकऱ्यांना मदतीची आस होती परंतु, त्यांचा भ्रमनिरास झाला.

## थोडक्यात

### झाडे लावा व संगोपन करा - नगराध्यक्ष अशोक परळीकर



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर येथील डॉ. बाबासाहेब परिसरामध्ये नगराचे नगराध्यक्ष मा. अशोक परळीकर यांनी पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड केली असून यावेळी झाडे लावा संगोपन करा असा संदेश सुद्धा यावेळी परळीकर यांनी दिला.

सध्या देशामध्ये तापमानामध्ये दिवसान दिवस वाढ होत असून झाडाची कत्तल मोठ्या प्रमाणात होत आहे कारण दळणवळणाच्या साधनासाठी मोठमोठे रस्ते सिंचन व्यवस्थापनासाठी मोठमोठे प्रकल्प गाव खेड्यात शहरासाठी पाणीपुरवठा हे काम करत असताना वृक्षाची कत्तल मोठ्या प्रमाणात होते परंतु कुठलीही यंत्रणा जेवढे झाडे तोडली तेवढी झाडे लावण्यास असक्षम असल्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेऊन झाडे लावा व संगोपन करा असा संदेश सुद्धा यावेळी अशोक परळीकर यांनी दिला. म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर परिसरात ६ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड करण्यात आली यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजकीय मंडळी उपस्थित होती.

### छत्रपती शिवाजी महाराजाच्या पुतळ्याचे सौदर्यकरण

**मंगरूळपीर :** आ. शामभाऊ रामचरण खोडे यांच्या हस्ते अकोला चौका मध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या



सौंदीकरणाच्या कामाचे शीला अनावरण करण्यात आले. यावेळी श्री नथूजी कापसे, श्री सुनील भाऊ मालपाणी व भाजपा उपनगर अध्यक्ष श्री अनिल गावंडे, श्री पंकज ढोरे, तसेच या कामाचे शीला अनावरण कारागीर कोल्हापूर श्री लखन ढोबळे सह श्री चंदू राऊत रवी चव्हाण प्रशांत गावंडे व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवैध मुरूम-वाळू माफिये सक्रिय; महसूल विभाग निष्क्रिय !

### *केनवड परिसरात दिवसा ताळमेळ, रात्रीचा खेळ *अवैध मुरूम उपशासाठी निघालेली जेसीबी पलटी

● प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड ●

मेहकर-मालेगाव महामार्गावर अवैध वाळू वाहतुकीवर कारवाईचा गाजावाजा केला जात असताना, दुसरीकडे केनवड परिसरात मात्र दिवसा ताळमेळ आणि रात्री अवैध गौण खनिज उपशाचा खेळ सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. या सर्व प्रकाराकडे रिसोड महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असून, त्यामुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांचे मनोबल वाढल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

तालुक्यात अवैध मुरूम उत्खनन आणि वाहतुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असतानाच, काल रात्री सुमारे दहा वाजताच्या सुमारास कुकसा



फाट्याजवळील बेलगाव पांदण रस्त्यावर अवैध मुरूम उपशासाठी ट्रॅक्टरच्या ताफ्यासह जात असलेली जेसीबी अचानक पलटी झाली. या अपघातात चालकाचा पाय जेसीबीखाली अडकून तो तब्बल अर्धा तास जीवाच्या आकांताने मदतीची वाट पाहत होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी दुसरी जेसीबी बोलावून पलटी झालेली मशीन सरळ केली आणि मोठ्या प्रयत्नांनंतर चालकाची सुटका केली. त्यानंतर जखमी चालकाला पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. विशेष म्हणजे, ज्या परिसरात हा अपघात झाला त्या भागात अवैध मुरूम उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी अनेक वेळा महसूल प्रशासनाकडे करण्यात आल्याचे ग्रामस्थ सांगतात. मात्र संबंधित विभागाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने मुरूम माफियांचे जाळे अधिक मजबूत होत असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर दि. १७ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या डङ'महास्वराज्य समाधान शिबिरा'डङची ही चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आयोजित शिबिर अर्धवट सोडून संबंधित नायब तहसीलदार मेहकर-मालेगाव महामार्गावर वाळूच्या टिप्परांवर कारवाई करण्यात व्यस्त असल्याचे त्यावेळी चर्चेत आले होते. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून अवैध गौण खनिज उत्खननाला संरक्षण देणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एनसीसी कॅडेट्सची प्लास्टिकविरोधी जनजागृती रॅली

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वाशिम येथे राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने प्लास्टिक मुक्त भारत अभियानांतर्गत जनजागृतीपर उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कापडी पिशव्यांचा वापर वाढविण्यासाठी एनसीसी कॅडेट्सनी रॅलीच्या माध्यमातून नागरिकांना जागरूक केले. एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या रॅलीत ४७ हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी प्लास्टिक हटवा, कापडी पिशवी वापरा अशा घोषणा देत शहरात फेरी काढली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी कापडी पिशवी



वापरण्याची प्रतिज्ञा घेत पर्यावरण रक्षणासाठी कटिबद्धता व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व, वाढते प्रदूषण आणि त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचे बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, शाळेचे मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दांभीवाल, पर्यवेक्षक किशोर राठोड तसेच एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## शाहीर भगत यांची कलापथकाद्वारे जनजागृती

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम तालुक्यातील उमराकापसे येथील ७५ वर्षीय शाहीर तथा लोक कलावंत शंकर यशवंता भगत यांनी कलापथकाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा संकल्प केला आहे. आज वयाची पंचाहत्तरी सुरू असतांनाही शंकर भगत आपल्या लोककलेच्या माध्यमातून समाजातील अनिष्ठ चालीरिती व अंधश्रद्धेबाबत कलापथकातून जागर करून नि:स्वार्थपणे समाजसेवा करत आहेत.

उमरा कापसे येथील गरीब कुटुंबात जन्मलेल्या शंकर भगत यांना बालपणापासूनच शाहीरीची आवड होती. गावात व परिसरात येणाऱ्या कलापथकात सहभागी होवून ते आपली लोककला जनतेसमोर सादर करत होते. १५ वर्षापूर्वी त्यांनी गावामध्येच कलापथकाची स्थापना करून त्यांनी काही सहकाऱ्यांना सोबत घेवून उमराकापसे व परिसरातील गावात कलापथकाद्वारे सामाजिक, सांस्कृतिक



विषयाला अनुसरून समाजातील अनिष्ठ चालीरिती व अंधश्रद्धेबाबत जन जागरणाचे कार्य अविरतपणे सुरू ठेवून आपली लोककला जोपासली आहे. शाहीर शंकर भगत यांचे कलापथकात कचरू खडसे, गायक मधुकर भगत, तबला वादक मारोती निरगुडे, देवराव भगत, श्रीराम भगत, यशवंता खडसे, उत्तम भगत, भिकाजी भगत व इतर सहकारी सहभागी होतात. आज शाहीर शंकर भगत यांनी वयाची पंचाहत्तरी ओलांडली असूनही शासनाकडून त्यांना अद्यापही लोक कलावंताचे दरमहा मानधन सुरू झालेले नाही. समाजकल्याण विभागाने शाहीर शंकर भगत यांना लोक कलावंताचे दरमहा मिळणारे अनुदान सुरू करावे अशी मागणी होत आहे.

## अखेर पिंपरी मोडक येथील धरण रद्द!

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

*** शेकडो शेतकऱ्यांचे उध्वस्त होणारे परिवारा वाचले**
*** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली दखल.**
*** अमोलभाऊ पाटणकर यांचे शेतकऱ्यांनी मानले आभार.**

कारंजा तालुक्यातील पिंपरी मोडक येथील धरण रद्द करण्याबाबतचा केल्या ७ महिन्या पासून सुरू असलेला शेतकऱ्यांचा संघर्ष, शेकडो शेतकऱ्याचे उध्वस्त होणारी परिवार, शेतकऱ्याचे दुःख, शेतकऱ्याचे कधी न भरून निघणारे नुकसान, शेतकऱ्यांच्या भावना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस यांनी समजून घेऊन अखेर पिंपरी मोडक येथील धरण रद्द केले. या शेतकऱ्याच्या संघर्षामध्ये देवदूत म्हणून धावून येणारे मा. मुख्यमंत्री यांचे उपसचिव अमोल भाऊ पाटणकर यांचे शेतकऱ्यांनी शतशः आभार मानले.

पिंप्री मोडक येथे होणारे धरणा रद्द करणे बाबत दिनांक २२ जानेवारी



रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे ठराव घेण्यात आला या ठरावावर १५० शेतकऱ्यांनी सह्या केल्या व बहुसंख्य गावकरी मंडळी उपस्थित होती.

संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना अंधारात ठेवून हा प्रकल्प करण्याचा अट्टाहास केला. या धरणामध्ये आमची जमीन गेली तर ८० टक्के शेतकरी भुमिहीन होईल. पिंप्री मोडक येथे होणाऱ्या धरणाच्या मागे २ कि.मी. अंतरावर हिवरा लाहे येथील धरण आहे. पिंप्री मोडक येथील प्रकल्पात जाणारी शेती हिवरा लाहे धरणाच्या ओलिताखाली येते. या धरणाची भिंत गावाच्या ४०० मीटर अंतरावरुन जात असल्यामुळे गावाला धोका आहे. पिंप्री मोडक येथे परिसरामध्ये पाण्याची मुबलकता आहे. सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई नाही. तसेच उद्या आम्हाला गाव सुध्दा सोडावे लागणार त्यामुळे बेरोजगारी वाढणार असा भयावह प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे आम्हाला शेवटी सामुहिक आत्महत्या केल्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही याची आपण दखल घ्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. धरणग्रस्त कृती समिती अध्यक्ष किरण क्षार व सचिव संदीप इचे यांनी हा लढा धरण रद्द होईपर्यंत सुरूच राहील असे सांगितले. निवेदनात दिलेल्या सर्व विषयांचे बारकाईने आकलन करून महाराष्ट्रा मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी मोडक येथे होणारे धरण अखेर रद्द केले

## विविध विकासनिधीतून झालेली कामे दाखवा, बक्षीस मिळवा...

# केनवडात लाखो रुपयांच्या विकास निधीवर डल्ला !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

अंचळनंतर आता केनवड परिसरातही विविध विकासकामांबाबत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत, अंगणवाडी, शाळा, वैद्यकीय उपकेंद्रे यांना पुरविण्यात आलेल्या विविध वस्तू, तसेच पाणीपुरवठा, नाली बांधकाम, रस्ते, पूल, घनकचरा व्यवस्थापन आणि इतर विकासकामांवर लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याच्या नोंदी समोर येत आहेत. मात्र प्रत्यक्षात ही कामे झाली आहेत का, तसेच खरेदी केलेल्या वस्तू आजही अस्तित्वात आहेत का, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

ग्रामस्थांमध्ये अशी चर्चा रंगली आहे की, ग्रामपंचायत, अंगणवाडी, शाळा व आरोग्य उपकेंद्रांवर खर्च करण्यात आलेला निधी योग्य पद्धतीने वापरण्यात आला का? वॉटर फिल्टर, विविध साहित्य व इतर वस्तू प्रत्यक्षात उपलब्ध आहेत का? उपलब्ध असतील तर त्या दर्जेदार आहेत का? की निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरवून उच्च दर्जाची बिले काढण्यात आली? विकासकामे मंजूर अंदाजपत्रकानुसार

### म्हणे, सीईओंनी घेतली किंमत; म्हणूनच नाही चौकशीची हिंमत..

केनवड परिसरातील विविध ग्रामपंचायतींमध्ये विकासनिधीच्या खर्चाबाबत प्रश्न उपस्थित होत असताना संबंधित कामांची अद्यापही सखोल चौकशी होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील व्हाउचर, खर्चाच्या नोंदी आणि विविध विकासकामांबाबत 'कामे व वस्तू निकृष्ट दर्जाच्या, मात्र बिले उच्च दर्जाची' अशी चर्चा सुरू असतानाच, 'सीईओंनी घेतली किंमत; म्हणूनच नाही चौकशीची हिंमत..?' अशी उपरोधिक चर्चा परिसरात रंगू लागली आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, जर सर्व कामे नियमानुसार व पारदर्शकपणे झाली असतील, तर संबंधित विकासकामांची मोजमाप पुस्तिका (एमबी), व्हाउचर, अंदाजपत्रके आणि प्रत्यक्ष कामांची उच्चस्तरीय चौकशी करण्यास कोणतीही अडचण नसावी. त्यामुळे केनवडसह परिसरातील सर्व गावांतील विकासकामांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

झाली का? नाली, रस्ते, पूल आणि घनकचरा व्यवस्थापनाची कामे आजही प्रत्यक्ष ठिकाणी दिसतात का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. यामुळे परिसरात उपरोधिक स्वरात, 'केनवडात विविध विकासनिधीतून झालेली कामे दाखवा आणि बक्षीस मिळवा!' अशी चर्चा सुरू झाली आहे. जनतेच्या पैशातून झालेल्या प्रत्येक कामाचा हिशोब जनतेसमोर यायलाच हवा, अशी भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. दरम्यान, अंचळ प्रकरणानंतर संबंधित ग्रामसेवकांकडे असलेल्या केनवड परिसरातील कामांबाबतही आता चर्चा रंगू लागली असून, त्या ग्रामसेवकाचा 'प्रताप' केनवडमध्येही पाहायला मिळाल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे केनवड सर्कलमधील प्रत्येक गावात अशाच प्रकारचा भ्रष्ट कारभार झाला आहे का, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे.

केनवडसह अंचळ आणि परिसरातील सर्व गावांमध्ये मागील पाच वर्षांत विकासनिधीतून झालेली कामे आज प्रत्यक्ष जागेवर आहेत की भकास झाली आहेत, याची पडताळणी होणे तितकेच गरजेचे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विकासनिधीवरील खर्च, व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी), अंदाजपत्रके, बिले आणि प्रत्यक्ष कामांची तपासणी व्हावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. असा भ्रष्ट कारभार गावागावात घडला असून, केनवड परिसरातील प्रत्येक गावाची उच्चस्तरीय चौकशी करून विकासनिधीचा प्रत्येक रुपया नेमका कुठे आणि कसा खर्च झाला, याचा हिशोब जनतेसमोर आणावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

ग्रामपंचायत, अंगणवाडी, शाळा आणि वैद्यकीय उपकेंद्रांना दिलेल्या वस्तू प्रत्यक्षात आहेत का? वॉटर फिल्टर, विद्युत खांबावरील स्ट्रीट लाईट व इतर साहित्याची खरेदी दर्जेदार आहे का? नाली, रस्ते, पूल व घनकचरा व्यवस्थापनाची कामे जागेवर दिसतात का? जी कामे केली, ती आजही अस्तित्वात आहेत का? की काही कामे निकृष्ट दर्जाची करून अल्पावधीतच जमीनदोस्त झाली आहेत? की केवळ कागदोपत्री नोंदी करून विकासनिधीवर डल्ला मारण्यात आला?।। सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी केनवडसह परिसरातील प्रत्येक गावाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.



मंगळवार दि २ जून २०२६ सिटी न्यूज वाशीम वाशीम Express

अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...

भ्रष्टाचाराची चतृःसुत्री, कामे कागदोपत्री !

म्हणे सिईओच भ्रष्टाचारात साथी, चौकशी समिती आमच्या हाती

बुधवार दि ३ जून २०२६ सिटी न्यूज वाशीम वाशीम Express

अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...

ग्रामसेवकांचा प्रताप भारी, एमबी नुसार व्हाचर दाखवा एकतरी !

* व्हाउचरमध्ये विकास दिसतो, पण गावात शोधावा लागतो *म्हणे सीईओ हाताशी; मग भीती कशाचा

अंचळ केवळ सुरुवात... आता केनवड परिसरातील

गुरूवार दि ४ जून २०२६ सिटी न्यूज वाशीम वाशीम Express

ग्रामसेवक पैशासाठी लाचार, कामे न करता भ्रष्टाचार !

शुक्रवार दि ५ जून २०२६ सिटी न्यूज वाशीम वाशीम Expres

साहेब, कामे न करता वित्त आयोगाचा निधी गायब !

कागदोपत्रीच काम, कागदोपत्रीच दाम !

अंचळ शेजारील एका गावाचा विकासनिधीचा तपशील समोर; उच्चस्तरीय चौकशीची मागणी

